*Run by DARJ Training & Research Institute, Amravati Rg. No. MAH/189/12
**Recommended by Sant Gadge Baba Amravati University, Amravati, Dir. No. 37/2012
ancial Assistant of Indian Council of Social Science Research, Mumbai (ICSSR)/DARJ-83/676/12


Peer Reviewed and Referred Journal / ISSN 0975-590X

Inter Disciplinary Journal

DARJ

# DECISION AND ACTION RESEARCH JOURNAL

## SPECIAL ISSUE



# वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'साहित्य व कार्य'

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो ।
सकलांचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो ।
विश्वामाजी या योगे ।

"भारतीय वीर जवानांना समर्पीत"

**४थे राज्यस्तरीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज**

## विचार साहित्य संम्मेलन १७

**वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समिती, अकोला**

रजि.नं. ३१०/१४ एफ १७७१८

संपादक - डॉ.राजीव बोरकर

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शिर्षक | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1. | जय गुरुदेव | वसंत आबाजी डहाके | 1 |
| 2. | राष्ट्रसंताचे शिक्षणविषयक विचार | डॉ. गजानन नारे | 5 |
| 3. | राष्ट्रसंत तुकडोज महाराज यांचे शेतीविषयक व ग्रामसुधारणा विषयक विचार | प्रा.डॉ.सुलभा केशवराव पिंजरकर | 8 |
| 4. | Rashtrasant Tukadoji Maharaj and his Music | Dr. Snehshish Das | 11 |
| 5. | राष्ट्रसंताचा सांगीतिक दृष्टीकोण | डॉ.सौ.माणिक मेहरे | 13 |
| 6. | श्री. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोण | भास्कर भिकाजी धारणे | 15 |
| 7. | श्री. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : भजन व संगीत प्रभाव | प्राचार्य संतोष तोलबा तंत्रे | 17 |
| 8. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे स्त्री जीवन विषयीचे महत्व | डॉ.सौ.अंजली राजवाडे | 20 |
| 9. | राष्ट्रसंताचां सांगितीक दृष्टीकोण | डॉ.सौ.वर्षा ध. कुळकर्णी | 22 |
| 10. | Musical Religiousness and Shree Gurudeo Seva Mandal | Dr. Kumudi Barde (Kshirsagar) | 24 |
| 11. | एक बहुआयामी व्यक्तित्व : राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज | श्री. अंबादास बोरकर | 26 |
| 12. | श्री. लोकमान्य टिळक आणि राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज | डॉ. नंदकिशोर काळे | 28 |
| 13. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे काव्यातील सामाजिक विचार | डॉ. वैशाली एस. देशमुख | 30 |
| 14. | राष्ट्रसंताचे स्त्रि विषयक विचार | डॉ. ममता इंगोल–महल्ले | 32 |
| 15. | वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा महिला विषयक दृष्टिकोण | डॉ. चारुशीला राजेश्वर रुमाले | 38 |
| 16. | तुकडोजी की राष्ट्रभक्ति : वर्तमान संदर्भ में | डॉ. संगीता जगताप | 41 |
| 17. | राष्ट्रसंताचे वैचारिक मूल्य : एक आकलन | श्री. अनिलकुमार दडमल | 43 |
| 18. | वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सांगितीक कल्पकता | डॉ. उमेश चापके | 45 |
| 19. | राष्ट्रसंतांचा सांगितीक दृष्टिकोण | डॉ. स्नेहल सुनील डहाळे | 48 |
| 20. | जागतिकीकरण, खाजगीकरण, व्यापारीकरणाच्या काळात राष्ट्रसंताच्या विचारांची आवश्यकता | डॉ. श्रीकृष्ण काकडे | 50 |
| 21. | सन्त तुकडोजी का साहित्य : वैश्विक धरातल पर | डॉ. प्रवीण देशमुख | 52 |
| 22. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि त्यांचा सांगितीक दृष्टीकोण | डॉ. राजीव बोरकर | 56 |
| 23. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनातील ग्येयता | डॉ. सोपान सिताबराव वतारे | 59 |
| 24. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षणविषयक विचार | डॉ. बळीराम परशराम अवचार | 61 |
| 25. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील शिक्षणविचार | डॉ. भास्कर पाटील | 63 |
| 26. | राष्ट्रसंताचे स्त्री विषयक विचार | डॉ. प्रभाकर मोहे | 67 |
| 27. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची दलित सेवा | डॉ. बी.एस. मानवटकर | 70 |
| 28. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची सामाजिक, सांगितीक चिकित्सक मिमांसा | डॉ. मुक्ता महल्ले | 72 |
| 29. | राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | श्रीकृष्ण रामदासपंत पखाले | 74 |
| 30. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे संगीताच्या माध्यमातुन समाज प्रबोधन | श्री. सुनिल बी. कोल्हे | 76 |
| 31. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शिक्षणविषयक विचार | श्री. संतोष गोपाळकृष्ण कुलकर्णी | 80 |
| 32. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या खंजरी भजनाची सांगितीक परंपरा एक दृष्टीक्षेप | श्री. गजानन म्हा. लोहटे, डॉ. राम बोरगावकर | 82 |
| 33. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे वैश्विक प्रार्थना | बुध्दरत्न लिहितकर | 84 |
| 34. | विश्वकल्याणचा उद्गार : सामूदायिक प्रार्थना | डॉ. विनोद नामदेव इंगळे | 86 |
| 35. | राष्ट्रसंत तुकडोजी का युवा पिढ़ी को संदेश | आनंद र. बक्षी | 88 |
| 36. | तुकडोजी महारांजाची ग्रामसाधना | श्रीमती माधुरी म. पाटील | 90 |
| 37. | संगीताच्या माध्यमातुन समाज प्रबोधन | श्री. राजु एल. सरकटे | 92 |
| 38. | वंदनीय राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनावलीतील लोक सांगितीक तत्व | श्री. नाना विठ्ठल भडके | 95 |
| 39. | राष्ट्रसंताचा शैक्षणिक विचार | डॉ. शिवप्रसाद पंजाबराव वायाळ | 98 |
| 40. | राष्ट्रसंतांचे ग्रामसुधारणाविषयक विचार | श्री. शिवाजी आनंदराव सुर्यवंशी | 100 |

ISSN 0975-590X


# राष्ट्रसंताचे स्त्रीविषयक विचार

प्रा.डॉ. ममता इंगोले–महल्ले
डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर
जि. अकोला

महाराष्ट्राला संतकवींची थोर परंपरा लाभली आहे. ज्ञानेश्वरांपासुन तुकारामांपर्यंत अनेक संतांनी येथील सर्वसामान्य जनतेला आत्मोध्दाराचा आणि विकासाचा मार्ग दाखविला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, या संतांच्या थोर परंपरेतील विदर्भाच्या कुशीत जन्मलेले अनमोल रत्न होय. त्यांचे मुळ व्यक्तिमत्व अध्यात्मिक, ईश्वरपरायण तर होतेच पण त्याला आधुनिकतेचे विशेष परिमाण लाभले होते. ते कांतीदर्शी संतकवी होते. सर्वधर्म संप्रदायाचा समन्वय साधण्यासाठी जीवनभर कार्यरत राहिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजातील सर्वच वर्गाकरिता बोधामृत दिले आहे. त्यांच्या विविध ग्रंथांमधून ते अनुभवण्यास मिळते. यामध्ये महत्वाचा विचार ठरला तो दृष्टिपरिवर्तन पंचकाचा. यामध्ये राष्ट्रसंतांनी महिलोन्नतीवर प्रकाश टाकला आहे. ग्रामगीतेतील महिलोन्नती या विसाव्या अध्यायात व वैवाहिक जीवन या एकविसाव्या अध्यायात स्त्री–जीवनविषयक विचार विशेषत्वाने

विस्तृतपणे विषद करण्यात आले आहेत. राष्ट्रसंत तुकडोजींनी पूर्वकालीन संत व विचारवंतांप्रमाणे स्त्री ही पुरुषांसारखाच समाज जीवनातील एक अत्यंत महत्वाचा घटक मानला आहे. तथापि आपल्या पूर्वकालीन विचारवंतांपेक्षा स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व आणि एक वेगळे व्यक्तित्व विशेष करुन सांप्रत काळाला अनुसरुन विषद केले आहे. त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन विशाल व उदार असून कालोचित स्वरुपाचा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाजजीवनाविषयीचे अवलोकन अतिशय सूक्ष्म होते. या अवलोकनातून त्यांना समाज जीवनाचे जे दर्शन घडले व स्त्री कार्यक्षमतेची जी प्रचिती आली त्यातून स्त्री पुरुषांपेक्षा कुठल्याही बाबतीत कमी नाही असा अनुभव आला. या अनुभवाचा अविष्कार त्यांनी ग्रामगीतेतील ओव्यांमधून वेळोवेळी व्यक्त केला आहे. एकोणिसाव्या अध्यायाच्या शेवटी राष्ट्रसंत पूज्य साने गुरुजींचे एक अवतरण देतात 'मुलं म्हणजे देवाघरची फुलं, ती पवित्र आहेत नि ती पवित्रच राहिली पाहिजेत. त्यांना गरीब–श्रीमंतीच्या वादाची झळ, पंथ, पक्षांचा वारा, अनितीची जळमटं नाही लागू देता कामा! तरच इथं देवाचं राज्य येईल. देशाचा उज्ज्वल भविष्यकाळ त्यांच्या रुपानेच साकार होईल.' 'मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी आईची त्यामुळे ते आईला उपदेश करतात–

'निर्भय हो यह देश की माता मंगल कीर्ती कराने
सत्य शील अरु निर्मल मनसे विरो को उपजाने'

स्त्रीने निर्भय असलं पाहिजे, तरच ती सक्षम पिढी घडवू शकेल यावर त्यांचा विश्वास होता. आपल्या ग्रामगीतेत त्यांनी 'महिलोन्नती हीच देशाची उन्नती' अशी संकल्पना मांडली आहे.

**मातृगौरव :–**

राष्ट्रसंतांनी विसाव्या अध्यायाची सुरुवातच मायबाई मंजुळादेवीच्या प्रतिमेला–

'याच गुणे मातृदेवो भव, वेदाने आरंभीच केला गौरव
नररत्नाची खाण अपूर्व, मातृजाति म्हणोनिया'

अशा अभिवादनाने केली आहे. राष्ट्रसंत गुरुहूनही आईला श्रेष्ठ मानतात. ते महिलेला सर्वोच्च दर्जा देताना म्हणतात–

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, तीच जगाचे उध्दरी
ऐसी वर्णिली मातेची थोरी, श्रेष्ठ गुरुहूनिही

कारण तीच गर्भावस्थेपासून बालकास सुसंस्कार देऊन त्याचा विकास घडवून आणू शकते. या गोष्टीची जाण राष्ट्रसंतांना आहे. म्हणूनच ते सांगतात–

'विद्यागुरुहुनि थोर, आदर्श मातेचे उपकार
गर्भापासोनि तिचे संस्कार, बालकांवरी

म्हणूनच गर्भवती स्त्रीला आनंदी ठेवण्याचा आग्रह राष्ट्रसंत धरतात. तिला योग्य भोजन, आनंद, निद्रा, समाधान लाभावे म्हणून सर्वच बाबींकडे लक्ष ठेवण्याची सूचना ते करतात. या गोष्टींमुळे राष्ट्राचे धन असणारी उत्तम संतती निपजण्याला मदत होईल असे त्यांचे मत होते. मातेचा गौरव करण्याच्या बाबतीत त्यांनी एकही संधी सोडली नाही. यातच त्यांच्या मनामध्ये मातेकरिता किती गौरवाची भावना बसत होती ते स्पष्ट होते. राष्ट्रसंत आपल्या लिखाणात येथेच थांबत नाहीत तर पुढे जाऊन त्या संबंधीचे मत स्पष्ट करतात. 'जशी माता तसा पुत्र घडतो' असे त्यांचे ठाम मत आहे. म्हणूनच ते म्हणतात–

'मातेच्या स्वभावे पुत्राची घडण,
त्यास उज्ज्वल ठेवी तिचे वर्तन
स्त्रीच्या तेजावरीच पुरुषांचे मोठेपण, ऐसे आहे'

असे महत्व स्त्रियांना राष्ट्रसंत देतात. पुरुषांचे महत्व स्त्रियांमुळेच आहे असे या माध्यमातून राष्ट्रसंत सांगून जातात

**ग्रंथातील स्त्री-निषेधाचे कारण व मौलिक स्त्री-वैशिष्ट्य :**

स्त्री विकासाची वाटचाल पाहली असता सर्वप्रथम भारतात मातृसत्ताक कुटुंब पध्दती होती. या काळात स्त्रीच्या हाती सर्व सत्ता एकवटलेल्या होत्या. शेतीचा शोधही निऋती नावाच्या

...ने लावला असे म्हटले जाते. त्यानंतर मात्र, तिच्या ...णाला धक्का बसला. त्यानंतरच्या काळात मात्र, पुरुष सत्ता प्रस्थापित करण्यासाठी पुरुषांनी प्रथम कृषि क्षेत्र हाती घेतले व शारीरिक बळाच्या माध्यमातून प्रगती साधली व तिचे क्षेत्र घरापुरते संकुचित केले. धर्मग्रंथांच्या आधारे तिच्यावर नानाविध दूशणे लादली. भावविवषतेच्या तिच्या स्वभावधर्मामुळे तिला कमी लेखण्याची एकही संधी त्यांनी दवडली नाही. हजारो वर्षापासून स्त्री–जातीला अबला, दुर्बला, पशू, भोगवस्तू, शोभेची बाहुली, गुलाम तसेच परमार्थाच्या मार्गातील ...ड, नरकाचे द्वार, नकोशी, पायातील वहाण आदि शब्दांनी संबोधिले, तिची सतत उपेक्षाच केली. या लोकांना राष्ट्रसंतांनी मात्र रोखठोक उत्तर दिले आहे. ते म्हणतात–

काय देवी देवता भिन्न केल्या,
ऋषीपत्न्या नव्हत्या सांभाळिल्या ?
काय महिलात साध्वी नाही झाल्या, पहा पुराणी मागच्या
काय स्त्रियांनी नाही लिहिले वेद ?
काय नाही केला ब्रम्हवाद ?
नाना विद्याकला–भेद, यात प्रवीण कितीतरी
काय स्त्रियांनी प्राण नाही अर्पिले ब्रिदासाठी

महाराजांच्या मते भारतीय स्त्रीने आपल्या जीवनात विविध प्रकारच्या भूमिका साभाळल्या आहेत. प्रपंचातून परमार्थ साधत बुद्धी चातुर्याची चुणुक दाखवित, रणकौशल्य गाजवत पतीच्या जीवनाशी त्या समरस झाल्या आहेत. फुलाहून नाजूक असणारी स्त्री ब्रिदासाठी प्रसंगी प्राणही देते. म्हणूनच महाराज म्हणतात–

का म्हणा अबला तिला, ती शक्तीशाली नाही का ?
काय कमी देवे केले, तिज मानवाहुनी सांग ना
अरे ! तुझ्याहुनी ती उत्तम वागते,
समाजी उत्तम भाषण देते
तुलाहि शाहणपण शिकवू जाणते,
मग ती मागे कशाने ?

स्त्री–पुरुष संसाररुपी रथाची दोन चाकं परस्परांच्या सहकार्यानेच परस्परांचा जीवनपट सुकर करणारी. ती दोन चाकं सारखी असली तर संसार रथ व्यवस्थित चालेल. म्हणून स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समानतेचा संदेश देतांना महाराज स्पष्टच म्हणतात–

म्हणोनि रथाची दोन्ही चाके,
मजबूत करावी कातोनि सारखे
तरीच संसारगाडी सुखे, सुखावेल ग्रामजीवनाची

राष्ट्रसंतांचे स्त्रीविषयक विचार किती कालोचित व पुरोगामी स्वरुपाचे होते याचा प्रत्यय यावरुन येतो. ते स्पष्टच सांगतात, समाजाने स्त्री–पुरुष समानतेची भूमिका स्वीकारली नाही तर समाजाची अधोगती ठरलेलीच आहे.

येथेच समाजाचे चुकले, एकास उचलोनि दुसऱ्यासी दाबले
याचे कटू फळ भोगणे आले, कितीतरी स्थानी

संसारात पुरुष जरी कुटुंबातील कर्ता–करविता असला तरी स्त्रीचे स्थान कुटुंबात श्रेष्ठच असते. कारण तिच्याच जोरावर संसार चक्र सुरु असते. म्हणून राष्ट्रसंत म्हणतात–

म्हणोनि विधीने सेवन उचित बोलिले,
महिलेविन विश्व न चाले
काय होते पुरुषाने केले ?, अभद्र झाले घर सारे।

घराची चेतन शक्ती म्हणजे गृहिणी. आपल्या सुख–दु:खाकडे दुर्लक्ष करुन अत्यंत प्रेमळपणे संसार सांभाळणाऱ्या स्त्रीचे चित्र रेखाटताना राष्ट्रसंत म्हणतात–

खस्ता सोसूनि परिचर्या, प्रेमळपणे बारीक कार्या
करु जाणाती उत्तम भार्या, न कंटाळता काळजीने

अडीअडचणीचे काळात स्त्री ही पतीलाच नव्हे तर संपूर्ण घरादाराला सांभाळून घेते हे हा समाजपुरुष विसरला. ती मात्र तिचे कर्तव्य विसरली नाही. म्हणूनच ती आपले कार्य मनोभावे करीत राहिली आहे.

यावर राष्ट्रसंत लिहितात–

जेव्हा पुरुष होय चिंतातुर, तेव्हा घरची लक्ष्मी सांगे विचार
हे मी पाहिले घरी अपार, प्रसंग येता जाण्याचे

आपला पती अडचणीत असताना त्याला योग्य सल्ला देणारी घरातील गृहिणीच असते.

उत्तम महिला हेचि करी, आपुले घर ब्रीदासह सावरी
मूलबाळ आदर्श करी, वरी प्रेमळपण सर्वांशी

अशा वागणाऱ्या स्त्रीचा आपण अजूनही योग्य मान सन्मान करु शकलो नाही. स्त्रियांना सतत डावलल्यामुळे आज त्यांच्यात विद्रोह प्रगट होत असेल तर ते साहजिकच आहे. आपण त्यांच्या नजरेमधून विचार करणे क्रमप्राप्त ठरेल.

**स्त्रियांच्या अनावस्थेत राष्ट्राची दुर्गती व स्त्री सामर्थ्य :**

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा स्त्रियांच्या नैतिक व आत्मिक सामर्थ्यावरच अवलंबून असल्याचे दिसून येते. स्त्री ही जेवढी सक्षम व सशक्त असेल तेवढीच विकासास कारणीभूत ठरु शकते. राष्ट्रमाता जिजाऊ, झाशीची राणी लक्ष्मीबाई, रजिया सुलताना, मदर तेरेसा यासारख्या मातांनी भारताची सक्षम जडणघडण करण्यात आपले आयुष्य वेचल्याचे सर्वश्रुत आहे. पण तरीही आजच्या युगामध्ये आम्ही स्त्रियांचे वर्चस्व मान्य न करता त्यांना दुत्कारणचे कार्य सतत करीत आलो आहोत. मात्र याचा परिणाम म्हणजे उद्या हे जग सक्षम न निपजता दुर्बल व अपंग निपजले तर आश्चर्य वाटायला नको. राष्ट्रसंत म्हणतात–

हीन–दुबळे केले स्त्री–समाजा,
तैसीच पुढे वाढली प्रजा
म्हणती स्त्रीजात तेवढी पशूच समजा,

पाशवी झाले जग सारे
कोणी भोग वस्तु समजोनि भली
सजवोनि ठेवीलि नुसती बाहुली
त्याने घरोघरी शिरला कली, अबला बनली मायभूती

आज सर्वत्र स्त्रियांवर अन्याय होताना दिसतो. हा अन्याय त्या किती काळ सहन करणार आहेत ?पण स्त्रीचे हे जे रुप आपण बघतो ते वरवरचे आहे. जर ती खऱ्या अर्थाने विरोध करायला लागली तर ती रणचंडिका बनल्याशिवाय राहणार नाही. यावर राष्ट्रसंत भाष्य करतात–

स्त्रियेसारखी मोहिनी नाही, स्त्रियेसारखी वैरागिणी नाही
स्त्रियेसारखी मुलायम नाही आणि कठोर रणचंडिका

स्त्रियांच्या आंतरिक गुणांनाही राष्ट्रसंतांनी खूप महत्व दिले आहे, ते म्हणतात–

महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास,
करील ऐसे शिक्षण खास
जरि दिले जाईल त्यास, तरीच भावी जग पालटे

स्त्रियांवर संस्कार करुन तिच्यातील आंतरिक गुणांचा विकास करावा, तिला शिकवावे, शिक्षण द्यावे असेही ते सांगतात. शिक्षणाने स्त्रिया व मुली धीट होतात यावर त्यांचा विश्वास आहे.

समाजाचा महिलांवर अन्याय : सामर्थ्यशाली असणाऱ्या महिलांना आजही पडदा पध्दती, परावलंबन यांना सामोरं जावं लागत आहे. समाजात महिलांवर होणाऱ्या अन्यायांमध्ये वाढ होत असल्याचे निश्चित दिसून येते. आधीच तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल असे समजले जाते. अशात तिचे लग्न झाल्यानंतर तर तिच्यावर होणाऱ्या अन्यायाची गणतीच करता येत नाही. येथे राष्ट्रसंत म्हणतात–

काही लग्न होता गुंतविली घरी,
नसे बोलण्याची हि उजागिरी
चूल आणि मूल हीच चाकरी, सांगती तिज

स्त्रियांना चूल आणि मूल यात गुंतवून ठेवल्यामुळे तिचा विकास खुंटत चालला आहे. आजची स्त्री पुढारली आहे असे जरी आपण म्हणत असलो तरी तिची स्थिती बरेच काही बोलून जाते. आजच्या युगामध्ये स्त्रियांना जी वैचारिक व बौध्दिक मदत द्यायला पाहिजे ती तिला मिळते का ? हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

काही घरातचि कोंडून ठेविती,
बिचारीला जगचि नसे जन्मजाती
जरी दिसली सूर्याप्रति, मारुनि करिती सरळ तिला
मुलीने सदा लपोनि राहावे, मुलाने गावी रागरंग पहावे
ऐसे हे दृष्ट रिवाज ठेवावे, न वाटती आम्हा

शारीरिक दृष्टया पुरुष हा स्त्रीपेक्षा बलवान असल्यामुळे त्याचे वर्चस्व प्रस्थापित करणे त्याला सहज शक्य आहे. पुरुषाने आपल्या वैयक्तिक सुखाचा विचार करुन सामाजिक नियम तयार केले. लग्न झाल्याबरोबर स्त्रीला घरात गुंतवून ठेवणे, कोंडून ठेवणे, जन्मापासून जगाला दिसू न देणे, जर घराबाहेर निघाली तर तिला मारणे, स्त्रीला खावे काय ? नेसावे काय ? वागावे, बोलावे कसे ? इत्यादी बाबींवर पुरुषी नियंत्रण होते. मुलींनी नेहमी घरात लपून राहावे व मुलांनी गावात रागरंग पाहावेत असे रीतीरिवाज बरोबर नाहीत असे राष्ट्रसंत म्हणतात.

स्त्रियांवरील अन्यायामुळे जगदेखील अन्यायी बनले आहे. ज्या स्त्रीने आपल्या देहात रक्तमासांचा अंश देत उदरात ज्या पुरुषाला जन्माला घातले त्यानेच अशा स्त्री देहाची विटंबना केली. यावर स्त्रीची कशाप्रकारे हेळसांड झाली ती गझलमधील शब्दांद्वारे स्पष्ट होते.

औरतने जनम दिया मर्दों को
मर्दोंने उसे बाजार दियाज
जब जी चाहा मसला कुचला
जब जी चाहा धुत्कार दिया

देवाने तिच्या देही मातृत्वाचा अनमोल ठेवा दिला आहे. पण समाजाने तो काडीमोल केला. एक भोगवस्तू म्हणून तिच्या देहाचा बाजार मांडला. परंतु कालांतराने स्त्री जातीचे भाग्य उदयास आले.

**प्रचलित विवाह पध्दती विषयीचे मत :-**

विवाह महिलांच्या जीवनातील अत्यंत भावनिक व मंगलमय क्षण. परंतु आज या पवित्र धर्म बंधनास समाजाने अपवित्र करुन ठेवले आहे. राष्ट्रसंत या संस्काराकडे अत्यंत विचारपूर्वक बघतांना दिसून येतात. आजच्या समाजामध्ये विवाह संस्कारात जो अनावश्यक खर्च व वेळेचा अपव्यय केला जातो त्याच्या विरोधात ते होते. ते म्हणायचे की ग्रहगोलाची गणिते व शकुन–अपशकुनासह तिथी वगैरे बघण्याची आवश्यकता नाही, तर प्रसन्न हवा, पाणी व ॠतु व सज्जनांची उपस्थिती हाच सुमूहूर्त असतो.

आज विवाहामध्ये हुंडा प्रथेमुळे कित्येकांचे विवाह मोडले. प्रसंगी मुलींचे बळीही गेले, पण तरीही समाज सुधारत नाही. राष्ट्रसंत म्हणतात की, विवाह हा एक सामाजिक संस्कार आहे. हा संस्कार प्रत्येकाने जीवनात अंगिकारला तर सामाजिक जीवन परिपूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. समाजाने हुंडा घेणाऱ्यांचा विरोध केलाच पाहिजे. म्हणून ते लिहितात–

ज्याने मुला–मुलींचे पैसे घेतले,
त्यासी समाजाने पाहिजे निशेधिले
तरीच हे दुराग्रह मोडले, जातील आता

आज समाजाची दुरावस्था ही केवळ जातीपातीमुळे झाली आहे. जातीचा विचार करणे अत्यंत गैर आहे. हिंदुस्थान जर माघारला असेल तर तो या विघातक रुढींमध्ये अडकला असल्यामुळे. म्हणूनच राष्ट्रसंत मिश्र विवाहाचा पुरस्कार करताना म्हणतात–

गुण गुणाकडे धाव घेतो, आपण शास्त्रीपुराणेही ऐकतो
मिश्र विवाहाने बिघाड होतो, म्हणणे व्यर्थ

याप्रकारे जो मिश्र विवाहास मान्यता देतो तो एक प्रकारे समाज विकासास मान्यता देतो असे म्हणावयास हरकत नाही. समाजाचा अभ्यास करताना त्यांचे लक्षात आले की विवाहामध्ये पैसा वाया जातो आणि म्हणूनच पैसा वाचविण्याकरिता ते सामुहिक विवाह आयोजनावर भर देतात. हे विवाह समाजाच्या विकासास निश्चितच कारण ठरतील हे त्यांचे मत आजच्या युगात मान्यता पावत आहे.

राष्ट्रसंत विधवा विवाहाविषयीची मते मोठया पोटतिडीकेने मांडतात–

वेगळे नियम प्रतिष्ठेसंबंधी, विधवा होता विवाह–बंदी
निर्वाहाचीहि नाही संधि, ही भेदबुध्दि कशासांठी ?
काही स्त्रिया विधवा होती, केश काढूनि विद्रूप करिती
त्याने कैसी साधे संन्यासवृत्ति, मला नसे ठावे हे

विधवा स्त्रीचा छळ नानाविध प्रकारांनी हा समाज करीत राहतो. तिला धार्मिक, सामाजिक कार्यामध्ये सहभागी होऊ दिले जात नाही. तिने काय खावे, काय लयावे यावरही बंधन घातले जाते. तिला जीवन नकोसे केले जाते. मात्र राष्ट्रसंत अशा विधवेला मानवतेने व मानाने वागविण्याचा सल्ला देतात. विधवांचा प्रश्न का निर्माण झाला याचा विचार करता त्यांच्या असे लक्षात आले की हा प्रश्न निर्माण झाला तो बालविवाह प्रथेमधून. आपल्या समाजात बालविवाहाची प्रथा अस्तित्वात आली आणि समाजाच्या विकासालाच खीळ बसली. लहान वयामध्ये मुलामुलींचे विवाह करुन दिल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचा अभ्यास राष्ट्रसंतांनी केला. म्हणूनच ते विधवा विवाहाचा पुरस्कार करीत असतानाच बालविवाहाचा तेवढयात तीव्रतेने निषेध करताना म्हणतात–

ऐशा गोष्टीस मात्र जपावे, बाळपणी हि लग्न नसावे
समजूतदारीने करुनि द्यावे, लग्नप्रसंग

तसेच राष्ट्रसंत कुमारिका असणाऱ्या स्त्रियांच्या पाठीमागे समर्थपणे उभे राहतात. त्यांचे समर्थन करताना म्हणतात–

जैसा पुरुष राहे ब्रम्हचारी,
तैसी स्त्रीहि असू शकते कुमारी
अधिकाराची उणीव सारी, घालविली पाहिजे

संततीनियमन स्त्रियांनीच करायला पाहिजे या विचाराला छेद देताना राष्ट्रसंत म्हणतात–

स्त्रीजातीस संतति नियमन–बेडी,
परि पुरुषास काही नाही बेरडी
हे म्हणणे नसे अविचारी खोडी, वाटते मज
नियमन असावे ते सर्वांसि, अभ्यास द्यावा तो दोघांसि
विशाल करावे विचार शक्तीसि, देशक्लेश समजावोनि

अशा रितीने ते सामाजिक कुप्रथांचा निषेध करुन योग्य रीतीरिवाजांचा पुरस्कार करतात. राष्ट्रसंतांनी याबाबत उपाययोजना समाजाला दिली आहे त्याचा विचार या ठिकाणी केला आहे.

**स्त्रीशिक्षणाची यथार्थ दृष्टी :**

राष्ट्रसंतांचे विचार अत्यंत पुरोगामी आहेत. ते म्हणतात–

समाजि जो पुरुषासि आदर,
तैसाचि महिलांशी असावा व्यवहार
किंबहूना अधिक त्यांचा विचार, झाला पाहिजे समाजी

मात्र समाज हे विसरला. त्याने पुरुष जातीला उच्च स्थान देवून स्त्री जातीला गुलामीकडे लोटले. त्याची कटू फळे ते आजही भोगत आहेत. स्त्रियांना शिक्षण दिल्यास या देशाचा स्वर्ग होण्यास वेळ लागणार नाही असे राष्ट्रसंत म्हणतात–

शहाण्यांनी हे विसरु नये, यावी सर्वांची करावी सोय
जेणे पुरुषांचे तैसेचि स्त्रियांचे होय, उत्थान आता
तरीच ग्राम शोभू लागे, पुरुष–नारी दोन्ही विभागे
जेणे स्वर्गचि उतरेल कार्ययोगे, विकासाच्या

महिलांना उच्चतम शिक्षण द्यावे, त्यांच्यातील आंतरिक गुणांचा विकास करावा, त्यांना टापटीप, गाणे, बोलणे, अनुरूप वागणे शिकवावे असेही ते म्हणतात. शिक्षणातदेखील स्त्री–पुरुष समानता हे सूत्र पाळले जात नाही याबद्दल खंत व्यक्त करताना ते म्हणतात–

मी पाहिले मुले फार शिकती, यंत्रविद कारागिर होती
परी मुलींसाठी योजना अति, मंद आहे शिक्षणाची
ऐसे समाजी न व्हावे मुलांपरीच, मुलींना शिकवावे
त्यांचे स्थानमान नेहमी असावे, सहकारितेचे

मुलांना ज्याप्रमाणे शिक्षण दिले जाते त्याप्रमाणेच मुलींनाही योग्य शिक्षण द्यावे, त्यांची हेळसांड करु नये असेही राष्ट्रसंत सुचवितात. समाजामध्ये स्त्रिया व पुरुषांमध्ये दुरावा निर्माण होण्याचे महत्वाचे कारण जर कोणते असेल तर ते आहे शिक्षणाचा अभाव. या शिक्षणाच्या अभावामुळे आज स्त्री–पुरुषातील वैचारिक दरी वाढत आहे.

समाजाने सहशिक्षण या गोष्टीचाही आज गंभीरतेने विचार केला पाहिजे. ते म्हणतात–

म्हणोनि सहशिक्षणही नाही वाउगे,
जरि नैतिक भाव राहती जागे
शिक्षणी जागृत ठेवणे सर्वांगे, काम नेत्या वडिलांचे

आज या सहशिक्षणाने परस्परांतील आकर्षण कमी होऊन अनाचार दूर होण्यास मदत होईल असे त्यांचे मत होते. या गोष्टीमुळे समाजात एक मुक्त वैचारिक वातावरण निर्माण होऊ शकते व असा समाज सामाजिकदृष्टया निकोप व सुदृढ असतो हे त्यांचे स्पष्ट व प्रामाणिक मत होते. ग्रामगीतेतून जीवन शिक्षणाविषयी विचार व्यक्त करताना राष्ट्रसंत मुलींच्या शिक्षणासोबतच ती स्वयंपाकातही सुजाण असावी अशी अपेक्षा

...करतात.

गावी भोजनाची अराती प्रसंग,
स्वयंपाक करता यावा यथासांग
हेहि कला शिकवावी सप्रयोग, मुला–मुलींसि
असले शिक्षण वाटते साधारण
परि याचे जीवनात अग्रस्थान
नाहीतरि जगावे जनावरासमान,
होईल स्वयंपाक न येता

स्त्रिया या मुळात हुशार असतात. त्यांना शिक्षणाचे द्वार मोकळे करुन दिले तर त्या आपल्या शिक्षणाच्याद्वारे आपल्या पुढे निघून जातील अशी भीती येथील अहं...णाच्या पुरुषास वाटायला लागली. परिणामी स्त्रियांची ...सासाची द्वारे बंद झाली.

मात्र सुमारे 1850 नंतर परत एकदा सर्व विचारसरणी ...लायला सुरुवात झाली. भारतात परत एकदा ...–शिक्षणाचे वारे वाहायला लागले. मुक्त व आनंददायी ...क्षण या समाजामध्ये निर्माण करण्याची भूमिका हा समाज ...त एकदा घेऊ लागला. मात्र समाजामध्ये स्त्री शिक्षिका ...त्या. समाजाची गरज लक्षात घेऊन महात्मा जोतिबा फुले ...नी आपल्या पत्नी सावित्रीबाईंना स्त्री शिक्षणाचे धडे देवून ...शिक्षिका बनविले. त्या मुलींना शिकवू लागल्या. या ...र्श्वभूमीवरच मुलांसोबत मुलींनाही शिक्षणाची संधी मिळालीच ...हिजे असा राष्ट्रसंतांचा आग्रह होता. मुलामुलींमध्ये शिक्षणाच्या बाबतीत जे भेदाभेद होते ते त्यांना पूर्णतः अमान्य होते.

मुलास विविध उच्च ज्ञान द्यावे,
तैसेचि मुलींनाही शिकवावे
हेळसांड करु नये हे जाणावे, समाजाने

ही त्यांची विचारसरणी होती. जी आपणास राष्ट्रसंतांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांमधून पाहावयास मिळते.

आजच्या काळात स्त्रियांना बरोबरीचे स्थान मिळत आहे. ...याचबरोबर सहशिक्षण व बरोबरीने पुढे जाण्याच्या संधीसुध्दा मिळत आहेत. मात्र राष्ट्रसंतांनी ज्या काळी व ज्या परिसरात ...दर विचार मांडले त्या काळात स्त्रियांना मानाचा व बरोबरीचा दर्जा नव्हता. म्हणून राष्ट्रसंतांनी मांडलेले स्त्री–शिक्षणाचे विचार महत्वपूर्ण व आदर्श ठरतात. ते आपल्याला नवचैतन्य व नवप्रेरणा देतात आणि म्हणूनच राष्ट्रसंतांचे विचार कालातील ठरतात.

**महिला संघटन :–** स्त्री ही अबला आहे अ... आज समज झालेला आहे. त्यामुळे तिच्यावरील अन्याय, अत्याचारात वाढ झाली आहे. या परिस्थितीत तोंड देण्यासाठी स्त्रियांचे एक संघटन असणे गरजेचे आहे असे राष्ट्रसंतांना वाटते. कारण आपल्या विरुध्द होणाऱ्या अन्यायांचा प्रतिकार ही एकटी करु शकणार नाही असा त्यांचा निश्चितच विचार होता आणि म्हणून ते म्हणतात–

जैसी मुलांची संघटित सेना,
तैसी स्त्रियांची असावी संघटना
अपुल्या सुखदुःखाच्या भावना,
प्रकटवाव्या सभा–संमेलनी
पुरुषांचे जैसे स्फूर्तिस्थान,
तैसेचि महिलांचे असावे उन्नतीभुवन
त्यात सभा, प्रार्थना,
कथाकीर्तन उपक्रम पूर्ण महिलांचे
दूर सारोनी जातीय आदि भाव जमवोनि
महिलासमुदाय सर्व
तिळगूळ, हळदीकुंकू, शारदोत्सव, सहभोजनादि करावे

यावरुन राष्ट्रसंतांना स्त्रियांच्या संघटना अपेक्षित आहेत. त्यांना त्यांच्या भावना, सुख–दुःखे, अडीअडचणी प्रगट करण्याकरिता एकत्र यावयास हवे. महिलांनी सभा, संमेलने घेऊन महिलोन्नतीचे मार्ग शोधावयास हवे हे जे राष्ट्रसंतांचे मत आहे ते आजच्या युगाला निश्चितच बोधप्रद आहे असे म्हणता येईल. अशाप्रकारे एकत्र येण्यातून स्त्रियांच्या आंतरिक गुणांचा विकास होईल, आत्मभान निर्माण होऊन वेळप्रसंगी प्राणपणाने प्रतिकाराची जाणीव निर्माण होईल, एकत्वाचे भान येईल व त्यातून अन्याय, अत्याचाराला थोडा तरी आळा बसेल ही राष्ट्रसंतांची दूरदृष्टी आजच्या काळातही यथार्थ आहे. कारण–

निरिक्षोणि जी जी घरे पाहिली,
तेथे सरसता अनुभवा आली

चातुर्य–

लक्षणे अधिक दिसली, महिलांप्रति असा दृढ विश्वास त्यांना होता.

**समारोप :–**

आजच्या काळात कर्तृत्ववान आणि सामर्थ्यवान अशा स्त्रीचे दर्शन घडत असले तरी स्त्री स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैरपणाने वागून स्त्रित्वाला कोठेही गालबोट न लागू देता स्वातंत्र्याचा संयमाने उपयोग करुन, तिच्या आंतरिक गुणांचा विकास करुन, तिच्यातील सामर्थ्याचा, तिला स्वतःला, समाजजीवनाला, राष्ट्रजीवनाला, तसेच विश्वोन्नतीसाठी उपयोग व्हावा ही काळाची गरज आहे असे स्त्रियांच्या उन्नती विषयक विचार राष्ट्रसंतांनी मांडले आहेत. त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट व प्रेरणादायी होते हे आपणास निश्चितपणे लक्षात येते. राष्ट्रसंत हे फक्त भाशणे करणारे किंवा भजन–कीर्तन करणारे संत नव्हते तर समाज मनाचा अभ्यास करणारे संत साहित्यिक होते. जनसामान्यांच्या भावभावनांना हात घालण्याची क्षमता त्यांच्याजवळ होती. म्हणूनच ते सर्वसामान्य जनतेस शब्दांच्या शक्तीने जागृत करीत असत. पेटून उठण्याची जिद्द व क्षमता निर्माण करीत असत.

राष्ट्रसंतांनी समाजाच्या व समाजातील चुकांवर नेहमीच

केलेले आहे. आजच्या युगामध्ये स्त्रियांवर होणारे स्त्रियांची होणारी मानसिक व शारिरीक ससेहोलपट आपल्या या भारत भ्रमणात अभ्यासली. परराष्ट्रातील होणारा मानसन्मान अवलोकिला आणि मग आपले मत तयार करुन समाजासमोर ठेवले. हे मत एवढे सुनिश्चित होते की समाजाने अगदी सहजतेने ते यामध्ये त्यांच्या विचारांचे माहात्म्य आपल्या लक्षात अध्यात्म आणि विज्ञान या दोन्हींच्या समन्वयातून निर्माण सुशिक्षित, सुसंस्कृत, समंजस, निर्भय, धाडसी, मायाळू, प्रेमळ, शांतताप्रिय, दयाळू अशी सर्वांगिण स्त्री ही राष्ट्रसंतांना अपेक्षित असणारी आदर्श स्त्री अशी आदर्श स्त्री समाज विकासास निश्चितच हातभार शकते व सक्षम पिढी घडवू शकते. हा राष्ट्रसंतांचा विषयक विचार पुढे नेणे हेच राष्ट्रसंत तुकडोजी राजांना अभिवादन ठरेल.

ग्रंथ:-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, संपादन– सुदाम सावरकर, महाराष्ट्र पाठयपुस्तक मंडळ, पुणे.

2) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता निरुपण, डॉ. अशोक कामत.

3) शेंदरे नमिता, राष्ट्रसंत स्त्रीदर्शन, ओम प्रकाशन, 1995

4) सावरकर सुभाष, राष्ट्रसंत आणि ग्रामगीता, जनसाहित्य परिषद, अमरावती 1997

5) सावरकर सुभाष, ग्रामगीता रहस्य स्पष्ट 2, जनसाहित्य परिषद, अमरावती

6) सामाजिक संशोधन प्रणाली – डॉ. डी. एल. जगाडे

7) श्री गुरुदेव मासिक – प्रा. रघुनाथ कडवे

8) राष्ट्रसंत प्रवचने – बाबा मोहोड

9) राष्ट्रसंतांची पत्रे – बाबा मोहोड

10) राष्ट्रसंत अमृतवाणी – केशवदास रामटेके

11) ग्रामगीता–स्व. सुदामजी सावरकर

12) दै.लोकमत, दै.मातृभूमि, दै.देशोन्नती